सं.फौ.प्र.क्र.३७४/२०१९
सरकार/ओमप्रकाश
निशाणी – १५ खाली

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: जासूंदा यशवंत पिल्लेवान,
वयः ५५ वर्षे, व्यवसायः शेती,
निवासस्थान: उसेगाव, ता.चिमूर, जि.चंद्रपूर.

**<u>शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. के. व्ही. तोकलवार यांच्यामार्फत</u>**

आरोपी ओमप्रकाश हा माझा पुतण्या आहे. फिर्यादी वंदना ही माझी जावु आहे. घटना अंदाजे दोन ते तीन वर्षांपुर्वी माझ्या जावुच्या घरी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी माझी जावु बैल जोडी पुजत होती. त्यावेळी ओमप्रकाशने वंदनाला शिवीगाळ केली होती. त्यावेळी ओमप्रकाशने ''तुझ्या मायला हेपो''अशी शिवीगाळ केली होती. शिवीगाळ केल्यानंतर ओमप्रकाश माझा दिर दिलीप याला मारायला गेला होता. त्यावेळी वंदना सोडवायला गेली. त्यावेळी वंदनाला त्याने ढकलुन दिले. त्यामुळे ती पडली होती. त्यामुळे तिच्या पायाला लागले होते. त्यानंतर माझा दिर राजकुमार हे भांडण सोडवायला आले. त्याला ओमप्रकाशने कॉलर पकडुन लाथा बुक्यांनी मारहाण केली होती. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. एन. के. गुरपुडे वकील यांच्यामार्फत</u>**

०२. पोलीसांनी उसेगाव येथे येवुन माझी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी घटना घडली त्यावेळी मी माझ्या घरी होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर व फिर्यादीचे घर लांब आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी मी घटनास्थळावर हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष घटना काही घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली होती असे मी खोटे सांगीतले.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा दिलीपला मारायला गेला, तेव्हा वंदना सोडवायला गेली असता आरोपीने तिला ढकलले व त्यामुळे ती पडली आणि तीच्या पायाला मार लागला असे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, माझ दीर राजकुमार हा भांडण

सोडवायला आला असता त्याला सुध्दा आरोपीने लाथा बुक्यांनी मारहाण केली असे मी खोटे सांगीतले.

०४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे घटनेच्या पुर्वीपासुन पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आता आरोपीसोबत आमची बोलचाल बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घरी असल्यामुळे घटना कशी घडली याबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक – ११/१२/२०२५

(आर. डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर